## आदेश निशाणी २१

१. दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी परवानगी मिळणेकरिता प्रस्तुत अर्ज अर्जदार/वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६, नियम १७ अन्वये सादर केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादींतर्फे विधीज्ञ एम. ए. खान व प्रतिवादी क्र.१ तर्फे श्री. जी. बी. राठी यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहिता मधील संबंधीत तरतुदींचा संदर्भ घेतला.

३. वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या कथनांचा व युक्तीवादाचा विचार करता खालील वादप्रश्न निर्माण होत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढे नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | उभय पक्षकारांतील वादग्रस्त असलेला खरा मुद्दा निर्णित होण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | ..... होकारार्थी |
| २) | आदेश | ..... अंतिम आदेशान्वये |

## कारणमिंमासा

**वादप्रश्न क्रमांक १ करिता :—**

४. वादीच्या कथनानुसार, अर्जामधील परिच्छेद क्र. १ ओळ क्र.१ आणि परिच्छेद क्र.३ ओळ क्र.१७ मधील ''सर्वे नं. ३७'' हा मजकूर वगळण्यात यावा. सदर ठिकाणी ''सर्वे नं.३५/१'' हा मजकूर टाकण्यात यावा. त्याबाबत वादींनी नमुना ८ चा उतारा दाखल केलेला आहे. सदर उता—याचे अवलोकन केले असता यामध्ये दावा मिळकतीचा ''सर्वे नं.३५/१'' असा नमुद असल्याचे दिसुन येते.

५. वरील विवेचनाअंती असा निष्कर्ष निघतो की, वादींनी प्रस्तुत अर्जान्वये अर्जामध्ये सुचविलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे योग्य व न्याय्य होईल. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत असून वादप्रश्न क्रमांक २ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रस्तुत अर्जान्वये सुचविलेली दुरूस्ती वादी यांनी विहीत मुदतीत करावी आणि त्याचवेळी दुरुस्त दाव्याची प्रत सादर करावी.

KHAJA CHANDSAB KALAL

Digitally signed by KHAJA CHANDSAB KALAL
Date: 2026.01.14 18:08:54 +0530

**(ख्वाजा चॉ. कलाल)**

दिनांक १४/०१/२०२६

सह दि. न्या. क. स्तर, मंगरूळपीर,
ता. मंगरूळपीर, जि. वाशिम.

# CERTIFICATE

" I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order."

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Shri. Khwaja C. Kalal,<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Mangrulpir |
| Order uploaded by | : | S. S. Rathod (Jr. Clerk) |
| Date of Order | : | 14/01/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 14/01/2026 |
| Order uploaded on | : | 14/01/2026 |